Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# ब्रम्हपूरीची बादशाही छावणी

सिताराम वसंत कोकरे

बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

***सारांश :***

मराठयांच्या इतिहासात महत्व असणारी अनेक ऐतिहासिक स्थळे व स्मारके आज मंगळवेढा शहराच्या आसपास त्याचप्रमाणे मंगळवेढा तालुक्यात असल्याचे आपणास दिसतात.

***प्रस्तावना :***

मात्र या ऐतिहासिक स्थळावर जेवढयाप्रमाणात प्रकाश टाकणे आवश्यक होते तितका प्रकाश त्या स्थळावर पडलेला दिसत नाही. जगाचा देशाचा इतिहास लिहित असताना स्थानिक इतिहासाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याचे आपणास दिसते. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात याचा स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे :-**

१.ऐतिहासिक ब्रम्हपूरी छावणीचे भौगोलिक स्थान व महत्व अभ्यासणे.
२.ब्रम्हपूरी छावणीवरुन थांबण्याच्या बादशाही राज्यकारभारावर प्रकाश टाकणे.
३.ब्रम्हपूरी छावणी ऐतिहासिक मंगळवेढा यांचे परस्पर संबंध तपासणे.

**ब्रम्हपूरी बादशाही छावणी :-**

छत्रपती शिवाजी महाराजाच्या मृत्युनंतर संभाजी, राजाराम राज्यभिषेकासाठी मराठी सत्ता याच्यासाठी तणावाचे वातावरणाचा उल्लेख इतिहासात असल्याचे दिसते. या पार्श्वभुमीवर मराठा साम्राज्यातील यादवीचा फायदा घेण्यासाठी औरंगाजेबची दक्षिण मोहिम व ब्रम्हपूरीची छावणी अनेक दृष्टीने महत्वाची आहे. ब्रम्हपूरी येथील औरंगाजेब बादशहाची छावणी म्हणजेच मुघल साम्राज्याची राजधानी होती. ब्रम्हपूरी मुघल साम्राज्याची राजधानी म्हणून मिळालेला वैधानिक दर्जा व सध्या ब्रम्हपूरी मंगळवेढयापासून जवळ असल्याने अनेक दृष्टीने महत्वाचे आहे. ३१ मार्च १६९६ मध्ये जवाहरमल व हिरा या दोन बांधकाम क्षेत्रातील तज्ञ सरदारांना ब्रम्हपूरी येथे छावणी वसविण्याचा आदेश बादशहाने सोलापूर येथून दिल्याचा उल्लेख मिळतो. बादशहासह अनेक नातेवाईक सरदारसह ब्रम्हपुरी छावणीत हजर होते. ब्रम्हपूरी या स्थळाचे भौगोलिक स्थान अनेक दृष्टीने औरंगाजेबने व मुघल सैन्याचे दृष्टीने फायदयाचे होते असे म्हणता येईल. राजकीय दृष्टीमुळे ब्रम्हपूरी छावणीकडे पाहिल्यास आपणास असे दिसते की, सोलापूर, विजापूर, सांगोला, मंगळवेढा, अकलुज, पंढरपूर या ठिकाणावर

सहज आक्रमण करण्यास व आपल्या ताब्यात ठेवण्यास सुलभ होते. ब्रम्हपुरी, माचणूर, घोडेश्वर इ. ठिकाणी सैन्यास पाण्याची सोय, चाऱ्यांची उपलब्धता मोठया प्रमाणातअसल्याचे दिसते.

धार्मिक दृष्टीकोनातून बादशहा औरंगाजेब यास नमाज पाडण्यासाठी मंगळवेढा व सोलापूर या ठिकाणी जात होता यावरुन ब्रम्हपूरीस भौगोलिक त्याचप्रमाणे धार्मिक महत्व विशद करता येईल. २० एप्रिल १६९९ नमाज पाडण्यासाठी बादशाहा यावेळी बरोबर मसुरखान बिदामखाना, तलबखाना व शहजादा कामबक्ष हा हजर होता. २१ एप्रिल रोजी नमाज पडून २२ एप्रिल १६९९ रोजी ब्रम्हपूरी छावणीत परत येण्याचे उल्लेख मिळतात. ऑगस्ट १६९९ मध्ये बादशाहा मंगळवेढयास जाण्यास निघाला तेव्हा कमलबखाने बादशाहास विनंती केली की, वाटेत चिखल झाल्यामुळे आपण जाण्याचे रद्द करावे. २४ ऑगस्ट १६९९ रोजी औरंगाजेब बादशहा मंगळवेढा किल्ल्याजवळ आपल्या निवासस्थानामध्ये दाखल झाल्याचे नोंद इतिहासात मिळते.

ब्रम्हपूरी येथील बादशाही छावणीतून देशाच्या राज्यकारभार चालत असताना ऐतिहासिक निर्णय झाल्याची नोंद इतिहासात नोंद सापडते.

या ब्रम्हपूरी स्थळावर मोघलांचे मनसपदार सिंधखेडाचे जाधव घराण्याचे जगदेवराज यांचा मृत्यु १९ सप्टेंबर १७०० रोजी ब्रम्हपूरी तळावर झाला. त्याच्रपमाणे कैदित ब्रम्हपूरी तळावर महाराणी येसुर्बा व शाहु महाराज होते. त्याचप्रमाणे न्यायाधिक त्र्यंबक शंकर व संताजी घोरपडे मृत्युनंतर त्यांचे मुंडके याच ब्रम्हपूरी छावणीत आणल्याचा उल्लेख मिळतात.

आज ब्रम्हपूरी हे ऐतिहासिक स्थळ मंगळवेढा पासून १४ कि.मी. अंतराव आहे. तात्कालिन बादशहाची छावणीत इतर गोष्टीचे दर्शन आजही ब्रम्हपूरी, माचणूर, बेगमपूर, घोडेश्वर याठिकाणी पहावयास मिळते.

**निष्कर्ष :-**

मंगळवेढा हे शहर ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा आहे. औरंगाजेब बादशहाचे या मंगळवेढा परिसरामध्ये वास्तव होते. आजही बेगमपूर परिसरात औरंगजेबाच्या छावणीचे अस्तित्त्वाचे पुरावे मोठया प्रमाणात मिळतात. त्यावर अधिक प्रमाणावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**संदर्भ साधने :-**

*१) गो.ग. सरदेसाई, मराठा रियासत खंड २, १९८९.*
*२) गोपाल देशमुख, सोलापूर जिल्हयाचा इतिहास (मराठा कालखंड) भाग १, रेवु प्रकाशन पंढरपूर प्रथम आवृत्ती २००९.*
*३) सर जगुनाथ सरकार, भाषांतर डॉ. म.ग. कुंटे, औरंगाजेबचा इतिहास मुंबई.*
*४) सेतु माधवराव पगडी, मोघल आणि मराठे प्रथम आवृत्ती १९८३, मुंबई.*



**छावणीचे प्रवेशद्वार**



छावणीचा आतील भाग



छावणी जवळून जाणारी भिमा नदी



**सिताराम वसंत कोकरे**

बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.